नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०६/२०२६ (रविवार)

---

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

## ३५ गोवंश जनावरांची सुटका, अरोली पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन अरोली :— दिनांक २७/०६/२०२६ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी कोदामेंढी शिवारात खातकडे जाणाऱ्या रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान आयसर कंपनीचा वाहन क्र. एच आर ५५/टी ४८६६ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **चालक आरोपी नामे सय्यद फिरोज सय्यद अमीर, वय ४७ वर्ष, रा. रज्जाक किराणा स्टोअर जवळ, प्लॉट नं. २५५, प्रवेश नगर वांजरी ले आउट, उप्पलवाडी नागपूर** हा मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **३५ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून आयसर कंपनीचा वाहन क्र. एच आर ५५/टी ४८६६ किंमती ७,००,०००/—रूपये आणि ३५ गोवंश जनावरे किंमती ३,५०,०००/—रूपये असा एकुण १०,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीविरूध्द कलम २८१, १२५, ३(५) भा.न्या.सं. ११(१) (ड) प्रा. छ. अधि. सहकलम ५ (ए), (२), ९ महा. पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




## १२५.६६५ किलोग्रॅम गांजा तस्करी प्रकरणातील आरोपी अटक
## देवलापार पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन देवलापार :— दिनांक २६/०६/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहा पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन देवलापार यांच्या नेतृत्वाखाली देवलापार पोलीसांनी अंमली पदार्थाविरोधात मोठी कारवाई करून १२५.६६५ किलो गांजा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार असा एकुण **३५,१३,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम ८(क),२०(ब) (पप) (सी) एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद आहे.**

**नमुद गुन्हयातील होंडा सिटी कार क्रमांक युपी १६ एपी २०४३ चा चालक आरोपी हा कार आणि मुद्देमाल सोडुन पळुन गेला होता. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात देवलापार पोलीसांनी गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुरावे आणि सात्यतपुर्ण शोध मोहीमेच्या आधारे दिनांक २८/०६/२०२६ रोजी सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी इमरान मो. हनीफ खान ,वय ३८ वर्षे, रा. लोकमान्य नगर बस स्टॉपजवळ, ठाणे शहर, जि. ठाणे याला खवासा (मध्य प्रदेश) बॉर्डर परिसरातून ताब्यात घेवुन अटक केली आहे.**

**साखळी पुरावे जोडुन नागपुर ग्रामीण पोलीस सदर गुन्हयाचा पुढील तपास करीत आहेत.**

# अवघ्या २ तासांत हरवलेल्या १० वर्षीय बालकाचा शोध
# नरखेड पोलिसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक २६/०६/२०२६ रोजी दुपारी सुमारे १२.०० वाजताच्या सुमारास अल्पवयीन बालक **चेतन नंदकिशोर बोरकुटे, वय १० वर्षे, रा. बेलोना** हा कोणालाही न सांगता घरातून निघून गेला होता. त्याचा सर्वत्र शोध घेऊनही तो मिळून न आल्याने त्याची आई पूजा गणेश वानखडे यांनी दिनांक २७/०६/२०२६ रोजी रात्री १०.०० वाजता पोलीस स्टेशन नरखेड येथे मुलगा हरवल्याची माहिती दिली.

सदर माहिती प्राप्त होताच मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन नरखेड आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथील ३ अधिकारी आणि ८ अंमलदारांचे संयुक्त शोध पथक तयार करून तात्काळ शोध मोहीम सुरू करण्यात आली.

**नमुद शोध पथकाने स्थानिक नागरिक, बस स्टॉप, हॉटेल चालक व सर्व सांभाव्य ठिकाणी चौकशी करून विविध ठिकाणी शोधमोहीम राबविली. पोलिसांच्या तत्पर व प्रभावी प्रयत्नांमुळे अवघ्या दोन तासांत हरवलेल्या बालकाचा शोध घेण्यात यश आले. सदर बालकाला लोणी, ता. वरुड, जि. अमरावती येथून सुखरूप ताब्यात घेण्यात आला. नमुद बालकाला त्याच्या पालकांनी रागवल्याच्या कारणावरून तो घरून निघुन गेल्याची प्राथमिक माहीती प्राप्त झाली असुन बालकास त्याच्या पालकांच्या ताब्यात सुखरूप सुपूर्द करण्यात आले.**

# प्रतिबंधीत असलेले कापसाचे बीटी बियाणे विक्रीसाठी वाहतुक व साठवणूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद,
# २ लाख ९६ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
# स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बोरी** :— दिनांक २७/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, चारचाकी वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत असलेले कापसाचे बीटी बियाणे याची विक्रीसाठी वाहतुक व साठवणूक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन बोरी हद्दीतील धवळपेठ परिसरात नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान संशयित टाटा ४०७ वाहन क्र. एम एच—४०/एन—०८२३ हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन नमुद वाहनाची तपासणी केली असता प्रतिबंधीत असलेले कापसाचे बीटी बियाणे मिळुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष एकुण ४२ पॅकेट कापुस बीटी बियाणे एकुण किंमती ४६,२००/— रूपये, टाटा ४०७ वाहन क्र. एम एच—४०/एन—०८२३ किंमती २,५०,०००/—रूपये, असा एकुण २,९६,२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी नामे भारत गोपाळराव बांगडे, वय ४३ वर्ष, रा. ब्राम्हणी, ता. जि. नागपूर यानी सदर प्रतिबंधीत असलेले कापसाचे बीटी बियाणे याचे विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे बोरी येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३१८(४), ३३६(४) तसेच बि बियाणे अधिनियम व पर्यावरण संरक्षण नियंत्रण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**



# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. चारचाकी वाहनासह ७ लाख ७६ हजार ४५० रूपयाचा मुद्देमाल जप्त काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक २७/०६/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, इसापुर काटोल येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे काटोल पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) बबन माणिकराव भोयर, रा. इसापुर काटोल २) मंगेश चंद्रशेखर मोहोड, रा. झिल्पा काटोल ३) मनोज धनराजजी बोरघोटे, रा. इसापुर काटोल ४) मनोज विठोबाजी लोखंडे, रा. इसापुर काटोल ५) संदिप रामदास मोरे, रा. झिल्पा काटोल ६) नितेश आनंदराव ढोके, रा. पंचवटी काटोल** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून १) ५२ तासपत्ते व रोख रक्कम ८४५०/— रूपये २) ०१ अॅडरॉइड मोबाईल किंमती २८,०००/—रूपये ३) कार मारूती सुझुकी बलेनो गाडी क्र. एम.एच ४०/ सी.क्यु ३४८७ किंमती ७,००,०००/—रूपये ४) ०१ मोटरसायकल किंमती ४०,०००/—रूपये असा एकुण ७,७६,४५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०६ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने